# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ४

## परिपत्रक

**क्र.रा.मं./पापुई–६/उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम/५२३४, दि.१६/१०/२०१९**

**विषय :– राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत उच्च माध्यमिक स्तरावरील नुसार व्यवसाय शिक्षण योजनेंतर्गत नव्याने व्यवसाय विषय सुरू करणेबाबत.**

संदर्भ: १.क्र.रा.मं./पापुई–६/उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम/१८७६, द.१०/०४/२०१७
२.राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.रा.मा.शि.अ./व्य.शि./७०/(२१/१७)/२०१८/८९८, दि.३०.०८.२०१८.
३.समग्र शिक्षा, मुंबई यांचे पत्र क्र.रा.मा.शि.अ./व्य.शि.४०/ (१६८/१६)/२०१९/१०५८, दि.३०.०९.२०१९.

राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत राज्यात शैक्षणिक वर्ष २०१४–१५ पासून व्यवसाय शिक्षण माध्यमिक स्तर व शैक्षणिक वर्ष २०१६–१७ पासून उच्च माध्यमिक स्तर योजनेची अंमलबजावणी सुरू झालेली आहे.

**सदर व्यावसायिक अभ्यासक्रम हे NSQF (National Skill Qualification Framework) प्रमाणे पंडित सुंदरलाल शर्मा सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ व्होकेशनल एज्युकेशन (PSSCIVE) भोपाळ यांचे मान्यताप्राप्त असल्याने शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे.**

उपरोक्त शासन आदेशानुसार हे व्यावसायिक अभ्यासक्रम इ.११वी आणि इ.१२ साठीच्या नियमित **वैकल्पिक विषयांतील १ विषय वगळून त्याऐवजी व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील १ विषय कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना घेता येईल. तथापि, जे विद्यार्थी व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील विषयासह इयत्ता ९ वी,इ.१० वी, व इ.११वी उत्तीर्ण असतील अशाच विद्यार्थ्यांना इ.१२ वी साठी व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील विषय घेऊन परिक्षेस प्रविष्ठ होता येईल.**

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत केंद्र शासनातर्फे मंजूरी मिळालेले पुढील विषय **शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये इयत्ता ११ वी साठी व शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८मध्ये इयत्ता १२ वी साठी सुरू करण्यात आले आहेत.**

| Sr. No. | Subjects | Subject Code No. |
|---|---|---|
| 1 | Automobile Service Technician | E-1 |
| 2 | Multi Skill Technician (General Engineering) | E-2 |
| 3 | Multi Skill Technician (Electrical) | E-3 |
| 4 | Multi Skill Technician (Gardening, Landscaping & Nursery Management) | E-4 |
| 5 | Automobile Service Technician(With Bridge Course) | E-5 |
| 6 | Multi Skill Technician (Food Processing & Preservation) | E-6 |
| 7 | Retail Sales Associate | E-7 |

समग्र शिक्षा, मुंबई यांचे पत्र क्र.रा.मा.शि.अ./व्य.शि./७०/ (२१/१७)/२०१८/८९८, दि.३०.०८.२०१८ नूसार खालील विषय शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून इ. ११ वी साठी आणि शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून इ.१२ वी साठी सुरु करण्यात आले आहेत. **या विषयांची इ.१२ वी ची प्रथम परीक्षा मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०१९ मध्ये आयोजित करण्यात आलेली होती.**

| Sr. No. | Subjects | Subject Code No. |
|---|---|---|
| 1 | Healthcare-General Duty Assistant | E-8 |
| 2 | Beauty & Wellness - Beauty Therapist | E-9 |
| 3 | Sports - Physical Trainer | F-1 |

समग्र शिक्षा, मुंबई यांचे पत्र क्र.रा.मा.शि.अ./व्य.शि./४०/ (१६८/१६)/२०१९/१०५८, दि.३०.०९.२०१९ नूसार खालील विषय शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून इ. ११ वी साठी आणि शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून इ.१२ वी साठी सुरु करण्यात आले आहेत. **या विषयांची इ.१२ वी ची प्रथम परीक्षा मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये आयोजित करण्यात येणार आहे.**

| Sr. No. | Subjects | Subject Code No. |
|---|---|---|
| १ | Agricultrual-Micro Irrigation Technician | F2 |
| २ | Banking Financial Services & Insurance -Business Correspondent | F3 |
| ३ | Media & Entertainment- Animator | F4 |
| ४ | Tourism and Hospitality- Travel Agency Assistant | F5 |

उपरोक्त चार विषयांची मूल्यमापन योजना, घटकनिहाय गुणविभागणी/प्रात्यक्षिकसाठी गुणविभागणी या सर्व बाबी राज्य मंडळाच्या परिपत्रक क्र.रा.मं./पापुई-६/उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम/१८७६, दि.१०/०४/२०१७ नूसार उपरोक्त १० विषयांप्रमाणेच राहील.

**उपरोक्त विषयाचे अभ्यासक्रम पंडित सुंदरलाल शर्मा सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ व्होकेशनल एज्युकेशन (PSSCIVE) भोपाळ या संस्थेचे मान्यताप्राप्त असल्याने शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे.** सदर अभ्यासक्रम तसेच या विषयांचे प्रश्नपत्रिका आराखडे **मंडळाच्या www.mahahsscboard. maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.**

तरी ज्या उच्च माध्यमिक शाळांमध्ये राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाअंतर्गत NSQF प्रमाणे नव्याने व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत. त्याप्रमाणे उच्च माध्यमिक शाळा प्रमुखांनी कार्यवाही करावी सदर परिपत्रक संबंधित उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांचे निदर्शनास आणून शाळांच्या सूचना फलकावर लावण्यात यावे व केलेला कार्यवाहीचा अहवाल विभागीय मंडळामार्फत सादर करावा.

ठिकाणः पुणे - ४११००४
दिनांकः १६/१०/२०१९

(डॉ. अशोक भोसले)
**सचिव,**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे - ४११ ००४.

**प्रत माहितीस्तव सविनय सादरः**

१. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
२. मा. आयुक्त (शिक्षण), पुणे
३. मा. राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप, मुंबई
४. मा. अतिरिक्त आयुक्त, मुंबई महानगरपालिका
५. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका

**प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:**

१. सर्व विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे,
   - उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधित शाळांना पाठविण्याची कार्यवाही करावी.
२. मा.राज्य प्रकल्प समन्वयक, समग्र शिक्षा अभियान, मुंबई
३. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग
४. शिक्षणाधिकारी (माध्य.), सर्व जिल्हा परिषदा
५. शिक्षणाधिकारी (माध्य.), पुणे व मुंबई महानगरपालिका
६. प्रशासनअधिकारी, सर्व महानगरपालिका शिक्षण मंडळे.